**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या महत्त्वाच्या संस्था, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि स्टार्टअप्सच्या बळावरच विकसित भारताचं उद्दिष्ट साकार होईल, असं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन

- विविध मंत्रालयांशी संबंधित अनेक संसदीय समित्यांची पुनर्रचना

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपाचे उमेदवार जाहीर

**आणि**

- आशियाई क्रीडास्पर्धांची आज सांगता, २१ सुवर्ण पदकांसह पदकतालिकेत भारत चौथ्या स्थानावर

**<><><><><>**

देशातल्या महत्त्वाच्या संस्था, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि स्टार्टअप्सच्या बळावरच विकसित भारताचं उद्दिष्ट साकार होईल, असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारतीय कंपनी सेक्रेटरीज संस्थेच्या ५८व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केल्याशिवाय देश पुढे जाऊ शकत नाही. जग वेगवान तांत्रिक विकासाच्या युगात प्रवेश करत असताना भारत आज सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे, असं राधाकृष्णन यांनी सांगितलं. भारतीय कंपनी सेक्रेटरीज संस्थेच्या सामायिक प्रयत्नांतून विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यात हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

विविध मंत्रालयांशी संबंधित अनेक संसदीय समित्यांची पुनर्रचना सभापती ओम बिरला यांनी केली आहे. भाजप खासदार भर्तृहरी महताब यांची वित्त समितीच्या तर काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांची,परराष्ट्र व्यवहार समितीच्या

अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे खासदार सुधीर गुप्ता यांची रेल्वे समितीच्या तर डॉ. काकोली घोष दस्तीदार, यांची नियुक्ती रसायने आणि खतं समितीच्या अध्यक्षपदी करण्यात आली आहे. काँग्रेसचे खासदार चरणजित सिंग चन्नी हे कृषी,पशुसंवर्धन आणि अन्न प्रक्रिया समितीचे अध्यक्ष असतील. भाजपचे खासदार राधा मोहन सिंग संरक्षण; तर राजीव प्रताप रुडी जलसंपदा समितीचे अध्यक्ष असतील. भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांची दूरसंवाद आणि माहिती तंत्रज्ञान समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून ग्रामीण विकास आणि पंचायत राज समितीच नेतृत्व काँग्रेसचे खासदार सप्तगिरी उलाका करतील. या समित्यांचा कार्यकाळ २६ सप्टेंबरपासून पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू होईल.

<><><><><>

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं अभिजात भाषांच्या अभ्यासासाठी ५ उत्कृष्टता केंद्रांच्या स्थापनेला मंजुरी दिली आहे. मराठी, आसामी, बंगाली, पाली, आणि प्राकृत या भाषांच्या अभ्यास आणि संशोधनासाठी ही केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे प्रगत शैक्षणिक संशोधन, भाषिक आणि साहित्यिक वारशाच जतन तसंच डिजिटलायझेशन आणि या भाषांशी संबंधित ज्ञानाचा व्यापक प्रसार करण्यासाठी विशेष संस्थात्मक आधार मिळेल.

ही उत्कृष्टता केंद्रे आसाममधील तेजपूर विद्यापीठ, पश्चिम बंगालमधलं विश्व-भारती विद्यापीठ, पुण्यातलं डेक्कन कॉलेज, ओडिशातलं केंद्रीय विद्यापीठ आणि गुजरातमधल्या केंद्रीय विद्यापीठात स्थापन केली जातील.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. ‘जनसेवेतून देशसेवा हा मंत्र आणि सतत समर्पणभावाचा’ हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या दोन सूत्रांचा अवलंब करत २०४७पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक

विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत प्रधानमंत्री स्वनिधी योजनेबद्दल…

## ***होल्ड… व्हीसी-***

*(आर्थिक दृष्ट्या दुर्बल वर्गातल्या लोकांना कोविड महामारीचा मोठा फटका बसला होता. त्यातून सावरण्यासाठी त्यांना पतपुरवठा करण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला. हातगाडी किंवा फिरत्या ठेल्यावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांसाठी प्रधानमंत्री स्वनिधी योजना केंद्रीय गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्रालयानं सुरु केली. १ जून २०२० रोजी योजनेचं उद्घाटन झालं. या योजनेत १५ हजार रुपयांपर्यंतचं कर्ज एक वर्षाच्या मुदतीसाठी दिलं जातं. कर्जदाराने वेळेत परतफेड केली तर पुढच्या टप्प्यात त्याला दीड वर्षाकरता २५ हजार रुपये पर्यंत कर्ज मिळू शकतं. तिसऱ्या टप्प्यात ही रक्कम ५० हजार रुपयेपर्यंत आणि मुदत ३ वर्षांपर्यंत वाढते. नियमितपणे परतफेड करणाऱ्यांना व्याजात सात टक्के अनुदान मिळतं. तारण ठेवण्यासाठी ऐपत किंवा गाठीशी मालमत्ता नसलेल्या फेरीवाले, दुकानदारांना या योजनेमुळे प्रगतीसाठी मदतीचा हात मिळाला. मार्चअखेरीपर्यंत देशभरात १७ हजार ११५ कोटी रुपयांची कर्जं या योजनेमार्फत वितरित झाल्याची माहिती नगरविकास मंत्रालयाने राज्यसभेत लेखी उत्तरात दिली)*

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत विरोधी पक्षांनी आज मुंबईत मोर्चा काढला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात मोठ्या संख्येनं आंदोलक तिरंगा ध्वज हातात घेऊन सहभागी झाले.

भारतीय जनता पार्टीने केंद्रीय निवडणूक आयोग आणि इतर यंत्रणांवर कब्जा मिळवला असल्याचा आरोप दोन्ही नेत्यांनी केला.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या जागांसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची घोषणा केली आहे. पुणे पदवीधर मतदारसंघातून स्मिता जाधव यांना, नागपूर पदवीधर मतदारसंघातून सुधाकर कोहळे यांना, तर पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ गावडे यांना भाजपाकडून उमेदवारी देण्यात आली आहे.

**<><><><><>**

दिल्लीच्या करोल बाग इथं भूमिगत मेट्रोच्या कामादरम्यान तिथल्या झाडांचं नुकसान होत असून ते थांबवण्यासाठीच्या याचिकेवर दिल्ली उच्च

न्यायालयानं दिल्ली विकास प्राधिकरण आणि दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाकडून उत्तर मागवलं आहे. या भागात मोठं बांधकाम सुरू असून पूर्ण वाढ झालेल्या झाडांना याचा फटका बसत असल्याचं याचिकेत म्हटलं आहे. या प्रकरणाची पुढची सुनावणी ६ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

रशियाबरोबरच्या संभाव्य युद्ध-विरामाबाबत भारतानं मांडलेला प्रस्ताव हा आपल्याला मिळालेल्या चार प्रस्तावांमधला सर्वात व्यापक प्रस्ताव असल्याचं युक्रेनचे परराष्ट्र मंत्री आंद्री सिबिहा यांनी म्हटलं आहे. रशिया-युक्रेन संघर्षावर परस्पर सहमतीनं तोडगा काढण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेला विचार सकारत्मक असल्याचं रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी काल म्हटलं होतं. या पार्श्वभूमीवर युक्रेननं आपली भूमिका स्पष्ट केली.

आपल्याला भारत, तुर्की, इजिप्त आणि अमेरिका यांच्याकडून युद्धविरामाचे प्रस्ताव मिळाले असून, यावर विचार करण्याची आपली तयारी आहे. मात्र, कोणताही करार हा केवळ लष्करी हालचालींपुरता मर्यादित न राहता, यामध्ये ऊर्जा आणि बंदरांच्या पायाभूत सुविधांची सुरक्षा, तसंच काळ्या समुद्रातल्या हालचालींचाही समावेश असायला हवा, असं सिबिहा यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज अमेरिकेच्या 'इंडो-पॅसिफिक कमांड'चे कमांडर ॲडमिरल सॅम्युअल जे. पापारो यांची भेट घेतली. हिंद-प्रशांत क्षेत्रात भारत आणि अमेरिका यांच्यातली सुरक्षा भागीदारी आणि सागरी सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उपायांवर यावेळी चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचा वाढता आर्थिक दबाव आणि निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर, निर्माण झालेली आव्हानात्मक परिस्थिती हाताळण्यासाठी आपण एक नवीन व्यवस्था स्वीकारल्याचं इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं आहे. इराणी जनतेवर दबाव आणण्यासाठी अमेरिका आणि इतर विरोधक आपल्या अत्यंत महत्त्वाच्या आर्थिक जीवनवाहिन्या तोडण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र जनतेचा पाठिंबा आणि सरकारी उपाययोजनांमुळे त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरत असल्याचं पेझेश्कियान यांनी समाजमाध्यमवरच्या पोस्ट मध्ये केला आहे.

**<><><><><>**

इंडोनेशियाच्या सुंबावा प्रांतात आज सकाळी ५ पूर्णांक ९ दशांश रिक्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली १० किलोमीटर खोलीवर होता, अशी माहिती स्थानिक हवामान विभागानं दिली. यावेळी कोणतीही हानी झाल्याचं वृत्त नाही.

**<><><><><>**

जपानमध्ये सुरु असलेल्या विसाव्या आशियाई क्रीडा स्पर्धांचा आज समारोप होत आहे. दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ चाललेल्या या रोमांचक क्रीडा स्पर्धांमधेत भारताने दमदार कामगिरी केली असून, २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांसह एकूण ८५ पदकांची कमाई केली, आणि पदकतालिकेत चौथं स्थान पटकावलं.

जपानमध्ये नागोया इथल्या पालोमा मिझुहो स्टेडियमवर या क्रीडा स्पर्धांचा समारोप सोहळा होणार असून, भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी अडीच वाजता हा कार्यक्रम सुरु होईल. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या खेळाडूंच्या संचलन फेरीत, भारताच्या ध्वजवाहक म्हणून नेमबाज नीरू धांडा यांची निवड निश्चित

झाली आहे. या कार्यक्रमात 'दोहा २०३०' क्रीडा स्पर्धांच्या आयोजन समितीकडे अधिकृतपणे जबाबदारी सोपवली जाईल.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत मराठवाडा आणि विदर्भाचा उर्वरित भाग, तसंच छत्तीसगड, तेलंगणा आणि उत्तर कर्नाटकच्या आणखी काही भागातून नैऋत्य मोसमी पाऊस माघारी परतण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

केरळ, माहे, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलमध्ये काही ठिकाणी आज जोरदार पाऊस पडेल, तर कोकण आणि गोव्यात उद्यापर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//